प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (PM-POSHAN) योजनेतंर्गत अनुसूचित जमाती घटकांतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना राज्य शासनाचा अतिरिक्त निधी वितरणाबाबत... (सन २०२५-२६)

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांकः शापोआ-२०२५/प्र.क्र.२१०/एस.डी.३/१४०८९६६**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ०२ मार्च, २०२६

**वाचा:-**

१) केंद्र शासनाचे आदेश क्र. प्र. क्र.३-४/२०२५- PMP-५ दि.२९ जानेवारी,२०२६.

२) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं -२०२५/प्र.क्र.४४/अर्थ -३, दि.०७ एप्रिल, २०२५.

३) शिक्षण संचालक (प्राथ.), प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.प्राशिसं/पीएम पोषण/२०२५-२६/०४४४९, दि.२९.०१.२०२६

४) शासन निर्णय क्र. शापोआ २०२५ / प्र.क्र.१९९ / एसडी-३, दि.०९.१०.२०२५, दि.१३.११.२०२५ व दि.०३.०२.२०२६

५) शासन निर्णय क्र.शापोआ २०२५/प्र.क्र.२०३/एसडी-३, दि.२९.१०.२०२५ व दि.१३.०२.२०२६ रोजीचा शासन निर्णय.

६) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.बीयुडी-२०२५/प्र.क्र.०४/कार्यासन-६, दि.२९.१०.२०२५, दि.१२.०२.२०२६ व दि.२६.०२.२०२६

**प्रस्तावना :**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मंजूर केंद्र हिस्स्याच्या निधीमधील तिसऱ्या हप्त्याचा रु.३११९२.०४ लक्ष इतका निधी संदर्भाधिन दि.२९ जानेवारी, २०२६ रोजीच्या आदेशान्वये राज्य शासनास उपलब्ध करुन दिला आहे. सदर निधीची विगतवारी सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या घटकांतर्गत केली आहे. प्रस्तुत योजनेकरीता केंद्र व राज्य हिस्स्याच्या खर्चाचे प्रमाण ६०:४० आहे. उपरोक्त केंद्र हिस्स्याच्या निधीपैकी अनुसूचित जमाती या घटकांतर्गत केंद्र हिस्स्याचा ६० टक्के प्रमाणे रु.१२६९.५१ लक्ष इतका निधी आहे (स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या रु.२५००/- प्रतिमाह मानधनामध्ये रु.६००/- केंद्र हिस्साचा समावेश आहे.) त्यास समरुप राज्य हिस्याचा ४० टक्के प्रमाणे रु.८४६.३४ लक्ष (स्वयंपाकी तथा

मदतनीस यांच्या रु.२५००/- प्रतिमाह मानधनामध्ये रु.४००/- राज्य हिस्सा समावेश आहे.) असा एकूण रु.२११५.८५ लक्ष इतका निधी दि.०३.०२.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत केला आहे. उपरोक्त शासन निर्णयान्वये स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या रु.२५००/- प्रतिमाह मानधनामध्ये रु.६००/- केंद्र हिस्सा व रु.४००/- राज्य हिस्सा असा एकूण रु.६००+रु.४००=रु.१०००/-इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनासाठी अनुसूचित जमाती या घटकांतर्गत राज्य हिस्यातून अतिरिक्त रु.१५००/- याप्रमाणे निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून अनुसूचित जमाती या घटकांतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना राज्य हिस्यातून अतिरिक्त रु.१५००/- याप्रमाणे रु.२८३.१३ (रुपये दोन कोटी त्र्याऐंशी लक्ष तेरा हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| लेखाशिर्ष | सन २०२५-२६ मधील अर्थसंकल्पिय तरतूद (पुरवणी मागणीसह) | या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत असलेला निधी |
|---|---|---|
| मागणी क्र.टी-५, २२०२ सर्वसाधारण शिक्षण ०१, प्राथमिक शिक्षण ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना अंतर्गत योजना, (०१)(२१) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (पीएम-पोषण) (आवर्ती-पुरक राज्य हिस्सा १०० टक्के) (कार्यक्रम) ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर), (२२०२ के ९७२) | रु.३२०८.८८ लक्ष | रु.२८३.१३ लक्ष |

२. सदर शासन निर्णय वित्त विभाग यांचा अनौपचारीक संदर्भ क्र.३३/व्यय-१४, दि.१८.०२, २०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. शालेय शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २३२५/(७०/२५)/अर्थसंकल्प, दि.१७.१०.२०२५ अन्वये शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून वितरीत केल्या जाणाऱ्या अनुदानाचे आहरण व संवितरण करण्याकरीता नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर निधी केंद्र व राज्य शासनाने वेळोवळी दिलेले निर्देश / आदेश / शासन निर्णय / परिपत्रक / सूचना यांना अनुसरुन विहित कालावधीत खर्च करण्याची दक्षता शिक्षण संचालक (प्राथ.) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घेण्यात यावी. तसेच, सदर निधी खर्च केल्यानंतर याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

५. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३०२१७४४५५९५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORT DEPARTMENT, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A39CEF3C157B9EE6A2ABE5779ACF233682613F7B9C335D6BF4877267695CECA, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2026.03.02 17:46:16 +05'30'

**(तुषार महाजन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री नगर विकास विभाग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री राज्य उत्पादन शुल्क व क्रिडा विभाग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री, शालेय शिक्षण, यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
८) सर्व मा. संसद सदस्य/ विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
११) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३) शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६) शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद (सर्व)
१७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र ½ , मुंबई/नागपूर
१८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१९) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
२०) वित्त विभाग (व्यय-१४), मंत्रालय, मुंबई
२१) आदिवासी विकास विभाग, (कार्यासन-६), मंत्रालय, मुंबई
२२) निवड नस्ती - एस.डी. ३